**पोलीस उप आयुक्त, प्रकटीकरण,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

---

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - २५/०९/२०२६**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेच्या प्रश्नसंच फुटीप्रकरणी दोन उमेदवारासह दोन मध्यस्थांना अटक केलेबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवर्गातील एकूण १५४ पदांकरीता (जाहिरात क्र. ११६/२०२५) दिनांक २२/०३/२०२६ रोजी महाराष्ट्रातील ०६ परीक्षा केंद्रांवर चाळणी परीक्षा घेण्यात आली होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या गोपनीयतेचा व निष्पक्षतेचा भंग करून, लोकसेवक म्हणून सोपविण्यात आलेल्या शासकीय कर्तव्याचा गैरवापर करण्यात आल्याचे तसेच आर्थिक फायद्यासाठी प्रश्नसंचाची अनधिकृत देवाणघेवाण करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झालेवरुन त्या अनुषंगाने कलम ११२, ३१६(४), ३१६(५), ३१८(४), २३८(ब), ३१७(२), ३०३(२), ६१(२), ३(५) भा. न्या.सं., सह कलम ११(१)(२)(३), १२(१)(२) महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४, तसेच कलम १३(२), १३(१)(अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) अन्वये कायदेशीर प्र.पो.नि. श्री. मंगेश देसाई यांनी दिनांक २५/०८/२०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून कफ परेड पोलीस ठाणे गु.र.क्र. ०१९५/२०२६ (गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.र.क्र. १०९/२०२६) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात विशेष तपास पथकाने शिताफीने व तांत्रिक पद्धतीने तपास करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गोपनिय कक्षातून तज्ञांनी निवड केलेल्या प्रश्नसंचाच्या प्रती तयार करून त्या आर्थिक फायद्यासाठी गैरमार्गाने बाहेर काढून अनधिकृतरित्या प्राप्त करून घेतल्याच्या प्रकरणात सहभाग असलेले अवर सचिव अभिजीत लेंडवे, गोपनिय कक्षात काम करणारा सहायक कक्ष अधिकारी विश्वेश्वर नकाते, सहायक कक्ष अधिकारी गोपाळ मराठे, कौटील्य ॲकडमीचे संचालक प्रविण पाटील सह मध्यस्थ अमृत पाटील, लोकेश उर्फ गौरव पाटील, उमेदवार ऋतुजा पाटील यांना यापुर्वी अटक केले आहे.

**गुन्हयाच्या अधिक तपासात निष्पण्ण बाबींच्या अनुषंगाने गैरमार्गाने प्रश्नसंच मिळविणाऱ्या उमेदवार १) साजिद संदे यांस सांगली येथुन २) विजय किंगर यांस बुलडाणा येथुन व याकामी मध्यस्थांची भुमिका बजावणाऱ्या ३) संदिप खलाटे, ४) भैरवनाथ कदम यांना नवी मुंबई येथुन विशेष तपास पथकाने दि. २४/०९/२०२६ रोजी अटक केली आहे. आतापर्यंत याप्रकरणी अटक आरोपींची संख्या ११ झाली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), तसेच मा. श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. राज तिलक रौशन, पोलीस उप आयुक्त, प्रकटीकरण, गुन्हे शाखा, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली, मा. श्री. सदानंद राणे, सहायक पोलीस आयुक्त, प्रकटीकरण-मध्य, गुन्हे शाखा, मुंबई व श्री. मंगेश देसाई, प्रभारी पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष यांच्या नेतृत्वाखाली मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखा, मुंबईचे, पोलीस निरीक्षक दादा गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक सचिन जाधव, प्रतापराव बंडगर, पल्लवी कोतवाल, प्रकाश गवळी, पोलीस उप निरीक्षक इंद्रजित सिरसाट, सचिन पाटील, रामेश्वर कामशेट्टे तसेच मालमत्ता कक्षातील अंमलदार यांनी सदर तपासामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

------oooo------